सकाळ

पुणे, शुक्रवार, ४ जानेवारी २०१९ १

# रुबेला आजाराने बालिकेचा मृत्यू

योगीराज प्रभुणे : सकाळ वृत्तसेवा

> सर्व मुलींनी विवाहापूर्वी रुबेलाची लस घेतली पाहिजे. सरकारने गोवर आणि रुबेला प्रतिबंधक लसीकरणाचा उपक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत नऊ महिने ते १५ वर्षांच्या मुला-मुलींना लस मोफत दिली जात आहे. 'रुबेला'ला प्रतिबंध करण्यासाठी ही लस मुलामुलींना आवर्जून द्या.
> - डॉ. संजय ललवाणी, वैद्यकीय संचालक, भारती हॉस्पिटल

पुणे, ता. ३ : रुबेला आजार झालेल्या नवजात बालकाचा पुण्यात मृत्यू झाल्याची माहिती पुढे आली आहे. गोवर आणि रुबेला हे आजार टाळण्यासाठी सध्या सुरू असणाऱ्या मोहिमेतून प्रतिबंधक लस घेणे आवश्यक असल्याचेही यातून स्पष्ट झाले आहे.

जन्मतः जेमतेम १७०० ग्रॅम वजन असलेली मुलगी भारती विद्यापीठाच्या नवजात अर्भक विभागात नुकतीच दाखल झाली होती. तिला श्वास घेण्यास त्रास होत होता. तिच्या अंगावर रॅश आली होती. तातडीने तिच्यावर उपचार सुरू करण्यात आले. अर्भकाच्या दोन्ही डोळ्यांमध्ये मोतीबिंदू झाल्याचे निदान पुढच्या तपासणीत झाले. त्या बाळाच्या मेंदूमध्ये काही ठिकाणी कॅल्शियम जमा झाले होते. त्याच्या डोक्याचा घेरही कमी होता, हृदयातही दोष होता. ही सर्व लक्षणे जन्मतः झालेल्या रुबेला आजाराची होती. त्यामुळे त्या दृष्टीने केलेल्या वैद्यकीय तपासण्यांमधून त्या नवजात अर्भकाला रुबेला सिंड्रोम झाल्याचे निदान झाले. तिच्यावर उपचाराचे सर्वतोपरी प्रयत्न करूनही तिसऱ्या दिवशी बाळाने प्राण सोडले. आई-वडिलांना हा धक्का होता. गर्भावस्थेतील सर्व सोनोग्राफी चाचण्या व्यवस्थित होत्या. पान ९ वर »

# 'रुबेला'ने नवजात बालिकेचा मृत्यू

» पान १ वरून

त्यात कोणताही दोष दिसून आला नव्हता. रुबेला या आजाराचे निदान प्रसूतीआधी होत नाही, अशी माहिती रुग्णालयातर्फे देण्यात आली.

बालरोगतज्ज्ञ डॉ. अमृता वाळिंबे म्हणाल्या, "गर्भवतीला रुबेलाच्या जंतूंचा संसर्ग झाल्यास- विशेषतः पहिल्या तीन महिन्यांमध्ये- तर जन्मणाऱ्या बाळाला हा आजार होण्याची शक्यता असते. या आजारात अनेक व्यंग असलेले बाळ जन्माला येते. त्याला मोतीबिंदू असतो. त्याच्या मेंदूची वाढ कमी होते. बहिरेपणा, हृदयदोष असण्याची शक्यता असते." रुबेलाच्या जंतुसंसर्गाची लक्षणे गर्भवतींमध्ये फारशी दिसत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बालरोगतज्ज्ञ डॉ. तन्मय देशपांडे म्हणाले, "गर्भावस्थेतील सनोग्राफीमध्ये या रोगाचे निदान होईलच असे नाही. भारतात दरवर्षी रुबेलाचा संसर्ग झालेली ३० हजार बाळे जन्मतात."